# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

## ।। प्र क ट न ।।

**विषय–** सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी ) परीक्षेसाठी खाजगीरित्या (Private Candidate) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नाव नोंदणी (Enrollment Certificate) प्रमाणपत्राबाबत व सदर विद्यार्थ्यांची परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करण्याच्या तारखांबाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेसाठी खाजगीरित्या (Private Candidate) प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी प्रमाणपत्रासाठी (Enrollment Certificate) नियमीत शुल्कासह ऑनलाईन अर्ज दिनांक २५ /०१/२०२१ पर्यत सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने जे विद्यार्थी नाव नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरलेले आहेत अशा विद्यार्थ्यांना त्यांची नाव नोंदणी प्रमाणपत्रे (Enrollment Certificate) दिनांक २५/०१/२०२१ पासून त्यांच्या भ्रमणध्वनीवर व ईमेलवर संदेश (SMS) उपलब्ध होतील. अशा विद्यार्थ्यांनी आपले स्वत:चे नावनोंदणी प्रमाणपत्र **http://form 17.mh-hsc.ac.in** व **http://form 17.mh-ssc.ac.in** या संकेत स्थळावरुन दिनांक २५/०१/२०२१ पासून उपलब्ध करुन घ्यावीत.

तसेच सदर नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थ्यांची सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे नियमीत शुल्कान ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर भरावयाची आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| शुल्क प्रकार | सन २०२१ च्या परीक्षेसाठी नाव नोंदणी केलेल्या खाजगी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन पध्दतीने परीक्षेची आवेदनपत्रे माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावयाच्या तारखा | खाजगी विद्यार्थी परीक्षा आवेदनपत्रांचे शुल्क माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| अ) नियमित शुल्कासह | सोमवार दि. २५/०१/२०२१ ते शनिवार दि. १३/०२/२०२१ | सोमवार दि.२५/०१/२०२१ ते बुधवार दि.१७ /०२/२०२१ |

अ) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर त्यांना कॉलेज Login मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली असेल शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती अचूक असल्याची खात्री करावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

ब) माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची तारीख सोमवार दि.२२ /०२/२०२१ राहील.

इ.१०वी व १२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने नियमीत शुल्कासह स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषतः आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२. सर्व विभागीय मंडळातील माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

३. आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारे भरण्यात यावे.

४. सर्व माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी गतवर्षीप्रमाणेच परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करुन चलनावरील नमूदप्रमाणे मंडळाच्या Virtual Account मध्ये NEFT/RTGS द्वारे वर्ग करावयाचे आहे. माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी NEFT/RTGS द्वारे वर्ग केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच Account Number व IFSC Code चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

५. उपरोक्तप्रमाणे आवेदनपत्रे नियमीत शुल्काने भरावयाच्या तारखामध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

( श्री.डी.बी.कुलाळ )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Letter /pawar